## प्रकरण ५ वे – आदर्श शिष्य व आदर्श गुरु

सद्‌गुरुविण सच्छिष्य। तो वाया जाय निशेष।
कां सच्छिष्येविण विशेष। सद्‌गुरु सिणे॥[१]
म्हणौनि सद्‌गुरु आणि सच्छिष्य। तेथे न लगती सायास।
त्या उभयतांचा हव्यास। पुरे येकसरा॥[२]

वरील दोन ओव्यात आदर्श गुरु व आदर्श शिष्य एकमेका-शिवाय निरर्थक ठरतात. सच्छिष्य आणि सद्‌गुरु यांची गाठ पडली की ज्ञानाची देवघेव करायला "सायास" पडत नाहीत. शिष्य आनंदाने ज्ञानग्रहण करतो व अशा शिष्यास ज्ञान द्यायला गुरुलाही तितकाच आनंद वाटतो. येथे ज्ञानाची – शिक्षणाची प्रक्रिया सुलभ घडते.

प्रथम आदर्श शिष्याची लक्षणे कोणती त्याचा विचार करु.

### – आदर्श शिष्य –

यस्य देवे पराभक्तिर्यथा देवे तथा गुरौ।
तस्यैते कथिता ह्यर्थाः प्रकाशयन्ते महात्मना॥[३]

ज्याची देवाप्रमाणे गुरुवर भक्ती आहे अशा भक्तियुक्त पुरुषांना ही उपनिषदातील विद्या उपयोगी पडणारी आहे. ज्ञान ग्रहणाच्या बाबतीत अनन्य साधारण भक्ती असणे आवश्यक आहे. ही भक्ती परमेश्वर आणि गुरु या दोहोंबद्दल पाहिजे. भक्तीयुक्त अंत:करणाने ज्ञानसाधना केली तरच त्या विद्येचा योग्य उपयोग होतो. वेदान्तातील रहस्य 'इन्द्रियदमन न करणाऱ्या, अयोग्य अशा पुत्राला किंवा शिष्याला' देऊ नये असे बजावले आहे.

वेदान्ते परमं गुह्यं पुराकल्पे प्रचोदितम्।
नाप्रशान्ताय दातव्यं नापुत्रायाशिष्याय वा पुनः।।[४]

या निषेध वाक्यातून उपनिषदातील विद्या इन्द्रियदमन करणाऱ्या शिष्यालाच किंवा तशा पुत्रालाच दिली पाहिजे हे स्पष्ट होते. प्रशान्त – ज्याने आपल्या इंद्रियांवर ताबा ठेवला आहे. अशा मनुष्याचे चित्त एकाग्र होऊ शकते. अशा एकाग्रचित्तानेच वेदान्तातील सर्वात गुप्त अशा विद्या ग्रहण करणे शक्य होते.

मुख्य सच्छिष्याचे लक्षण। सद्गुरुवचनी विश्वासपूर्ण।।
अनन्यभावे शरण। त्या नाव सच्छिष्य।। [५]

शिष्याची आपल्या गुरुवर पूर्ण श्रद्धा पाहिजे. अनन्यभावाने गुरुला शरण जाणारा शिष्य, आदर्श शिष्य होय. गुरुकडे जाणारा शिष्य नम्र असला पाहिजे. त्याचे द्योतक म्हणजे वाळलेल्या समिधा हातात घेऊन शिष्याने गुरुकडे जाणे –

–"स ह समित्पाणिश्चिक्रां गार्ग्यायणिं प्रतिचक्रम उपायानीति, तं होवाच ब्रह्मार्हो ऽसि गौतम यो न मानमुपागा, एहि व्येव त्वा ज्ञापयिष्यामि इति।।[६]

हातात समिधा घेऊन आलेल्या श्वेतकेतूला चित्र राजानी म्हटले – हे गौतमा, तू अभिमानाचा त्याग करून येथे आलेला आहेस. मी तुला शिकवीन.

शिष्याने अभिमानाचा त्याग केल्याबद्दल गुरुला त्याचे कौतुक वाटते. ते आपणहून त्याला शिकविण्यास तयार झाले.

अशा शिष्याने आपले अज्ञान गुरुजवळ प्रामाणिकपणाने उघड केले पाहिजे. अज्ञान झाकून स्वस्थ बसू नये. श्वेतकेतूला आपल्या अज्ञानाची खंत वाटते. तो म्हणतो - "नामेतदेद हन्त" स्वत: गुरु असून देखील आपल्याजवळ एखादी उणीव आहे हे लक्षात आल्यावर ज्ञानातील उणीव दूर करण्यासाठी स्वत: गुरु दुसऱ्या ज्ञानी गुरुकडे जातो. श्वेतकेतू व त्याचे पिता दोघेजण चित्राराजाकडे जाऊन आपले अज्ञान दूर करतात. आरुणि व श्वेतकेतू शिष्यभावाने राजाकडे जातात. अज्ञान दूर करण्यासाठी कष्ट करायची त्यांची तयारी आहे. अशा तऱ्हेने आपले ज्ञान त्यानी परिपूर्ण केले म्हणून त्याना आदर्श शिष्य म्हणता येईल.

ब्रह्मतत्वाची जिज्ञासा असणारे शिष्य आपली ज्ञानलालसा पूर्ण करुन घेतात. असे शिष्य आदर्श शिष्य होत.

प्रश्नोपनिषदात सुकेशा, सत्यकाम, सौर्यायणि, कौसल्य, भार्गव, कात्यायन हे सहा ब्रह्मजिज्ञासू शिष्य पिप्पलाद मुनींकडे नम्रभावाने गेले. आपले गुरु ज्ञानपूर्ती करतील अशी त्याना श्रध्दा वाटते. गुरुंकडे गेल्यानंतर गुरुंची आज्ञापालन करणे, सेवाभावी, वृत्तीने राहणे आवश्यक आहे.

पिप्पलाद मुनी आपल्या शिष्यांना सांगतात -

" भूय एव तपसा ब्रह्मचर्येण श्रध्दया संवत्सरं संवत्स्यथ।" ७

या शिष्यांना गुरुंकडे वर्षभर तपश्चर्या, ब्रह्मचर्य याचे श्रध्दापूर्वक पालन करायला सांगितले. आदर्श शिष्य त्यात कसूर करीत नाहीत.

आदर्श शिष्याच्या अंगी पुढील गुण असणे आवश्यक आहेत. शिष्य मनाचा निर्मळ, सदाचार संपन्न, पूर्णविरक्त, निष्ठावंत, अंतर्बाह्य शुध्द, मर्यादाशील असावा.

तसेच तो दीर्घोद्योगी असावा. अत्यंत धैर्यवान, उदार, परमार्थ्याविषयी आतूर असावा.

कठोपनिषादात नचिकेताने यमधर्माकडून ज्ञानप्राप्ती करुन घेतली तो प्रसंग पाहिला की वरील गुण आदर्श शिष्याचे सद्गुण आहेत असे म्हणता येते. मृत्यू म्हणजे काय या संबंधीचे ज्ञान म्हणजेच आत्मविद्या प्राप्त करुन घेताना नचिकेता इतर आमीषाना बळी पडला नाही. राज्यसंपदा, धन, यौवन, पशू इ. वैभव त्यानी नाकारले. अत्यंत धैर्याने, निष्ठेने त्याने आपले ईप्सित साध्य करुन घेतले.

आदर्श शिष्य ज्ञानश्रेष्ठ ऋषींकडे - गुरुंकडे जातात. आश्वलायन ऋषी भगवान परमेष्टींच्या जवळ येऊन म्हणतात -

अधीहि भगवन् ब्रह्मविद्यां वरिष्ठाम्। सदा सद्भिः सेव्यमानां
निगूढाम्॥[८]

नेहमी चांगल्या लोकांकडून समृध्द केली जाणारी विद्या मला शिकवा.

आपल्याकडे आलेल्या इंद्रिये व मन पूर्ण ताब्यात ठेवलेल्या शिष्याला सत्यस्वरुप व अविनाशी परमात्म्याचे ज्ञान होण्यासाठी त्या ज्ञान संपन्न गुरुने ब्रह्मविद्या यथाशास्त्र शिकवावी.

तस्मै स विद्वानुपसन्नाय सम्यक्
प्रशान्तचित्ताय शमन्विताय ।
येनाक्षरं पुरुषं वेद सत्यं
प्रोवाच तां तत्त्वतो ब्रह्मविद्याम् ॥[९]
क्रियावन्तः श्रोत्रिया ब्रह्मनिष्ठाः

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

स्वयं जुह्वत एकर्षि श्रध्दयन्त: ।
तेषामेवैतां ब्रह्मविद्यां वदेत
शिरोव्रतं विधिवद्यैस्तु चीर्णम् ।।[10]

ब्रह्मज्ञानास अधिकारी असणारे शिष्य आदर्श शिष्य होत. हे शिष्य कर्तव्यदक्ष, विद्वान, ब्रह्मनिष्ठ, श्रध्दावान, शिरोव्रत धारण करणारे असे शिष्य सच्छिष्य किंवा आदर्श शिष्य म्हणावे लागतील.
रामदासांनी शिष्याच्या लक्षणात सांगितले आहे -

" शिष्य पाहिजे अगाध । उत्तम गुणाचा ।।[11]

आदर्श शिष्याच्या अंगी सर्व उत्तम गुण असले पाहिजेत.
तो प्रज्ञावंत, प्रेमळ, नीतिमान, मर्यादाशील असावा.
युक्तिबुध्दीनी युक्त विवेकी असावा.
सात्त्विक वृत्तीचा, सेवाभावी, जगन्मित्र, परोपकारी, निर्मत्सरी, चतुर, उदार, धैर्यशील असावा.
रामदासस्वामी पुढे म्हणतात.

"ऐसे सच्छिष्याचे वैभव । सद्गुरुवचनी दृढभाव ।।[12]

सर्वसद्गुण हेच शिष्याचे वैभव आहे. हे वैभव असूनही तो शिष्य उद्दामवृत्तीचा नाही. त्याची सद्गुरुच्या वचनावर दृढश्रद्धा आहे. गुरुंची सेवा करण्यात तो कमीपणा मानीत नाही तर आदराने व भक्तीने गुरुसेवा करण्यात तो स्वत:ला भाग्यवान मानतो.

आदर्श शिष्य गुरुंच्या पाठोपाठ रानावनात काट्याकुट्यातून मार्ग काढीत असत, पूजेची सामग्री गोळा करणे, लाकूड फाटा गोळा करणे इ. कामे मनापासून करीत असत. गुरुंच्या सहवासातील क्षण त्याला

आनंदाचे वाटत. गुरुंचे आज्ञापालन हे त्यांना कर्तव्य वाटत असे.

आदर्श शिष्याचे वर्तन आदर्श असे. गुरुंनी घेतलेल्या परीक्षेत ते पुरेपूर उतरत असत. शिष्यांनी केलेला खोटेपणा गुरुंच्या लक्षात आला तर गुरुंचा शाप भोगण्याची पाळी शिष्यावर येई. आदर्श शिष्याने हे कटाक्षाने टाळले पाहिजे.

महाभारतातील कर्ण, अतिशय पराक्रमी, धैर्यशील, कष्टाळू, नम्र, स्वभावाचा. पण ज्ञानप्राप्तीसाठी त्याने गुरुंजवळ खोटेपणा केला. ब्राह्मण नसून त्यांना "भृगुपुत्र आहोत असे सांगितले. सत्य उघडकीला आल्यावर शिकलेली विद्या, श्रम सर्व व्यर्थ ठरले. गुरुंचा शाप भोगावा लागला.

म्हणून गुरुकृपा संपादन करणे हे आदर्श शिष्याचे लक्षण मानावे लागेल.

"अहो सद्गुरुकृपा जयासी । सामर्थ्य न चले तयापासी ।
ज्ञानबळे वैभवासी । तृणतुछ केले ।।[13].

नचिकेताने आपल्या मधुरभाषणाने, निर्भय वृत्तीने, चातुर्याने यमधर्माकडून ज्ञानप्राप्ती करुन घेतली. एवढेच नव्हे तर त्या गुरुकडून कौतुक करुन घेतले. सद्गुरुकृपा प्राप्त झाल्यावर ज्ञान-प्राप्ती बरोबरच गुरुंकडून प्रशंसा मिळते.

" यां त्वमाप: सत्यधृतिर्बतासि
त्वादृङ् नो भूयान्नचिकेत: प्रष्टा ।।[14]

आदर्श शिष्य, सद्गुरुकडून ज्ञानप्राप्ती करुन घेतो, त्या वैभवाच्या

जोरावर भौतिक वैभव हे क्षुद्र ठरते.

आजचा आदर्श शिष्य हा भावी आदर्श गुरु असतो. आदर्शाचे गुण त्याच्या अंगी मुरलेले असतात. अलीकडच्या काळातील गुरुदेव रानडे यांचे उदाहरण सांगता येईल. ते आदर्श शिष्य होते. तसेच ते आदर्श गुरुही होते. आजचा आदर्श विद्यार्थी उद्याचा आदर्श नागरिक आहे. अशा आदर्श विद्यार्थ्यांच्या अंगी तीक्ष्ण बुद्धिमत्ता, अगाध स्मरण-शक्ती, सखोल अभ्यास करण्याची प्रवृत्ती, ज्ञानार्जनाची जिज्ञासा, प्रयत्नशील वृत्ती व ध्येय गाठण्याची जिद्द असावी लागते. उच्च ध्येय त्याच्यापुढे असले पाहिजे.

" Not ambition but low aim is crime".

एखादा आदर्श शिष्य स्वत:च्या साधनेतूनच ज्ञान व अनुभूती मिळवितो. स्वत:च स्वत:चा गुरु बनतो.

तुकाराम म्हणतात -

सत्य-असत्याशी मन केले ग्वाही। मानियले नाही बहुमता।
तुका म्हणे होय मनासी संवाद। आपुलाची वाद आपणासी।।

अंतर्मुख होऊन आत्मपरीक्षण केले. आणि आत्मोन्नती साधली. आदर्श शिष्याची ही श्रेष्ठतम पायरी होय.

———

## -: आदर्श गुरु :-

गुरुचा महिमा विविध प्रकारे वर्णन केलेला आढळतो. कारण "गुरु" हे पदच अतिशय श्रेष्ठ आहे. गुरुची मूर्ती लहान असो वा महान, ज्ञानाच्या क्षेत्रात गुरुसमान कोणीही नाही.

गुरुर्ब्रह्म गुरुर्विष्णुर्गुरुर्देवो महेश्वरः।
गुरुः साक्षात्परंब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः।।

गुरु म्हणजे सर्व काही. गुरु हेच ध्यान, पूजा, मंत्र आणि मोक्ष यांचे मूळ होय.

ध्यानमूलं गुरोर्मूर्तिः पूजामूलं गुरोः परम्।
मन्त्रमूलं. गुरोर्वाक्यं मोक्षमूलं गुरोः कृपा।।

गुरुची प्रत्येक गोष्ट वंदनीय आहे. पण तो गुरु सर्वार्थाने आदर्श गुरु असला पाहिजे.

ज्यापासून काही शिकता येते त्याला गुरु म्हणता येईल. असे गुरुही अनेक असतील पण प्रत्येक गुरु परिपूर्ण असेलच असे नाही. म्हणून दत्तात्रेयानी चोवीस गुरु केले होते.

भारतीय संस्कृतीत गुरुपरंपरेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. ज्ञानमंदिराच्या प्रांगणात बोट धरून नेणारा तो गुरु होय. आणि ज्ञानमंदिराच्या गाभाऱ्यात नेणारा तो "सद्गुरु" होय म्हणजे आदर्शगुरु होय. गुरु शब्दाच्या अनेक व्युत्पत्ती प्रसिध्द आहेत.

१] "गिरति अज्ञानम्" - म्हणजे शिष्याचे अज्ञान दूर करणारा तो गुरु होय.

२] " गृणाति धर्मम्" - म्हणजे कर्तव्याचा उपदेश करणारा तो गुरू.

३] दुर्लभ: सद्गुरुर्देव: शिष्यसंतापहारक: । - शिष्याचे दु:ख दूर करणारा गुरु अत्यंत दुर्लभ आहे.

४] "मन्त्रदाता गुरु: प्रोक्तो मन्त्रस्तु परमो गुरु: ।"

५] आपली माता आणि पिता । ते हि गुरु चि तत्त्वता ।
परी पैलपार पावविता । तो सद्गुरु वेगळा ।।[75]

६] जे जे काही उत्तम गुण । ते ते सद्गुरु चे लक्षण ।।

गुरूजवळ सर्वच उत्तम गुण असले पाहिजेत. आदर्श गुणांनी युक्त असणारा गुरु आदर्श गुरु होय. किंवा आदर्श शिष्याला जो उत्तम प्रतिसाद देईल तो गुरु उत्तम होय.

७] गुरुरेक: शिव: साक्षाद् गुरु: सर्वार्थसाधक: ।
गुरुरेव परं तत्त्वं सर्वं गुरुमयं जगत् ।।[76]

दैनंदिन जीवनात रोजच्या अनुभवातून शिक्षण मिळत असते. पण दुर्गम शास्त्रात प्रवेश गुरूमुळे सुखावह होऊ शकतो. गुरू-परंपरेने प्राप्त झालेली विद्या सफल होते. गुरुच्या अंतर्यामी असलेली गुप्त विद्या ही श्रध्दापूर्वक गुरूची सेवा करणाऱ्यांना प्राप्त होत असते.
मनुस्मृतीत गुरुचे प्रकार तीन सांगितले आहेत.

१] आचार्य :- उपनीयतुय: शिष्य वेदमध्यापयेद् द्विज: ।
संकल्पं सरहस्यं च तमाचार्यं प्रचक्षते ।।

२] उपाध्याय :- एकदेशं तु वेदस्य वेदाङ्गानि अपि वा पुन: ।
योऽध्यापयति वृत्त्यर्थमुपाध्याय: स उच्यते ।।

३] गुरु :- निषेकादीनि कर्माणि यः करोति यथाविधिः।
सम्भावयति चान्येन स विप्रो गुरूरुच्यते।।

कोणत्याही प्रकारचा शिक्षक किंवा गुरु असला तरी त्यात शिष्याला पूर्णत्व देण्याची प्रवृत्ती आहे. शिष्याला जशी ज्ञानाची कळकळ असावी लागते तसे गुरूलाही योग्य त्या शिष्याला ज्ञान देण्याची तळमळ लागली पाहिजे. आपल्या जवळ असलेली सर्व विद्या उदार अंतःकरणाने जिज्ञासू शिष्याला ज्ञान देण्याची इच्छा पाहिजे.

दारी आलेल्या शिष्याचे स्वागत करुन त्याच्या गुणाचे कौतुक करून त्याला प्रोत्साहन देणारा असावा.

आदर्श गुरु हा शिष्याची परीक्षा घेताना कठोर बनणारा, पण शिष्य परीक्षेत यशस्वी झाल्यावर त्याच्यावर पुत्रवत् प्रेम करुन जिव्हाळ्याने वागणारा, शिष्याचे क्षेमकुशल पहाणारा असला पाहिजे. अशा गुरुनी आपले अध्ययन-अध्यापन कार्य सतत चालू ठेवले पाहिजे. गुरुचे ज्ञान यच्चयावत् असले पाहिजे. ज्ञानदानाची परंपरा त्याने सतत चालू ठेवली पाहिजे. ज्ञानात जर उणीव भासलीच तर ती दूर करण्याची त्याची तयारी पाहिजे. "चित्र" राजानी यज्ञाच्या वेळी "श्वेतकेतू"-ला बोलावले होते. विद्वान श्वेतकेतूला त्याने प्रश्न विचारला. "ह्या जगात सहजासहजी न दिसणारा, न प्राप्त होणारा आनंद-प्रांत दाखवशील का? तिथे नेशील का ?[१०] "
विद्वान असूनही श्वेतकेतूला किंवा त्याच्या पित्याला उत्तर आले नाही तेव्हा त्यानी शिष्यत्व पत्करून "चित्र" राजाकडून अज्ञान दूर करुन घेतले. अशा वेळी अज्ञान लपवून ठेवण्याचा किंवा आपले अज्ञान उघडकीला

आणणाऱ्याचा मत्सर, द्वेष, तिरस्कार केला नाही. अज्ञान दूर करण्यासाठी मनापासून प्रयत्न केले.

तसेच आदर्श गुरु हा संपत्तीने विकत घेता येत नाही. कारण त्याच्या ठिकाणी असणारी मन:शांती ही राजसत्तेपेक्षा श्रेष्ठ असते. राजा जानश्रुती, विद्वान रैक्वाकडे गेला. पैसे देऊन ज्ञान मागितले पण ते गुरुनी मान्य केले नाही. दरिद्री, भुकेकंगाल रैक्व अतिशय विद्वान पण बैलगाडी खाली स्वत:च्या देहाचे उन्हापासून रक्षण करीत होता. दरिद्री, व्याधींनी पीडलेला, घरदारही नसलेला, पण एक गोष्ट त्याच्याकडे होती, विद्वत्तेने आलेली मन:शांती! म्हणून राजाने त्याचे शिष्यत्व पत्करले. आणि विद्वान गुरुकडून ज्ञान मिळविले. आदर्श गुरुचे निकष म्हणजे विद्वत्ता आणि मन:शांती.

गुरुने आपली विद्या शिष्याला दिली नाही तर तो गुरु आदर्श नव्हे. ज्ञानदान न करणारा असाच एक गुरु आम्रवृक्षाच्या जन्माला गेल्याची कथा आहे. म्हणून गुरुने आपल्याजवळील ज्ञान दुसऱ्याना दिले पाहिजे. ज्ञानयज्ञ अखंड चालू ठेवला पाहिजे.

आदर्श गुरु शिष्याच्या हितासाठी उपदेश करतो.
ऐहिक व पारमार्थिक मार्गात शिष्याची उन्नती घडवून आणतो.
याज्ञवल्क्य मुनी आपली पत्नी मैत्रेयी हिने ब्रह्मज्ञानाबद्दल पृच्छा केल्यावर तिचे गुरु बनले आणि आत्मज्ञान करुन दिले.
स्त्रियांच्या बाबतीत पती हाच गुरु असे मनुस्मृती म्हणते.
" - पतिसेवा गुरौ वास: । "
ब्रह्मवादिनी स्त्रिया वीतराग महर्षींच्याजवळ राहून ज्ञानप्राप्ती करुन घेत असत.

आदर्श गुरूचे आपल्या ज्ञानविषयावर प्रभुत्व पाहिजे. शिष्यांनी विचारलेल्या शंकांचे योग्य ते निरसन करता आले पाहिजे.
जनकराजाने आयोजित केलेल्या विद्वद्सभेत याज्ञवल्क्याने अनेकांच्या प्रश्नांना समर्पक उत्तरे देऊन आपले ज्ञानश्रेष्ठत्व सिध्द केले. जरत्कारुचा पुत्र-आर्तभाग, लाह्यायन भुज्यु, चक्राचा पुत्र उषस्त ऋषी, कहोळ, वचक्नु मुनींची कन्या गार्गी, उद्दालक इ. विद्वानांनी विविध शंका कुशंका विचारल्या पण ज्ञानसामर्थ्यामुळे याज्ञवल्क्याने कुणापुढे हार खाल्ली नाही.[१८]

यावरुन आदर्श गुरुचे ज्ञानश्रेष्ठत्व सिध्द होते.
महाकवी कालिदासाने सुध्दा अशा अध्यापकास "सुतीर्थ" ही संज्ञा दिलेली आहे. ज्याचे ज्ञान केवळ उदरनिर्वाहापुरतेच आहे त्याला

"ज्ञानाचा व्यापारी" अशी पदवी दिली आहे.

" तं ज्ञानपण्यं वणिजं वदन्ति ।।[१९] "

उत्तम शिक्षकाचे लक्षण त्याने सांगितले आहे.

"यस्योभयं साधुस शिक्षकाणां
धुरि प्रतिष्ठापयितव्य एव ।।[20]

"शास्त्रज्ञान" व "शिकविण्याची कला" हे दोन्ही ज्याला चांगल्याप्रकारे जमते तो शिक्षकांच्यामध्ये अग्रगण्य होय.
चांगल्या शिष्याला, चांगल्या अध्यापकाने शिक्षण दिल्यास होणारा परिणाम चांगलाच दिसून येणार.

आदर्श गुरु आपल्या शिष्याला निःस्वार्थीपणाने व निरपेक्ष बुध्दीने ज्ञानदान करीत असतो. काया-वाचा-मनोभावे,

देहभान हरपून हे अध्यापनाचे कार्य चालत असे. त्यामुळे विद्यार्थ्यांचा प्रतिसादही तसाच मिळत असे. आदर्श गुरुच्या व्यक्तिमत्वाचा योग्य तो परिणाम होऊन शिष्य ही जीवावर उदार होऊन गुरुसेवा, गुरुंची आज्ञा पालन करण्यात स्वत:ला धन्य मानीत असत.

अशा आदर्श गुरुशिष्यांच्या अनेक जोड्या प्रसिध्द आहेत. नारद-सनत्कुमार, आरुणि-श्वेतकेतु, प्रजापती-इंद्र,विरोचन, इ. तसेच महाभारतात द्रोण-अर्जुन, सांदीपनी-कृष्ण, सुदामा, रामायणात-विश्वामित्र-राम, लक्ष्मण इ. भगवान श्रीकृष्ण व अर्जुन यांचा भगवद्गीतेत संवाद वर्णन केलेला आहे.

"तद्विध्दि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया ।"
[गुरुंची सेवा करुन, शंका विचारुन, नम्रतेने ज्ञान मिळव. ]
गुरुचे जीवन भव्य, उदात्त, त्यागमय आहे. शिष्यातील सुप्तशक्ती जागृत करुन त्यांचा विकास घडवून आणण्याचे काम गुरु करतात.

गुरुंविषयी आदरभाव व्यक्त करताना ज्ञानदेव म्हणतात.
"न गुरोरधिकं, न गुरोरधिकं, न गुरोधिकम् ।"

स्वामी विवेकानंद व त्यांचे गुरु रामकृष्ण परमहंस यांना अलिकडील काळातील आदर्श शिष्य व आदर्श गुरु म्हणता येईल.

गुरुदेव रवींद्रनाथ टागोरांचे शिक्षणाविषयीचे उदात्त विचार आहेत. विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीनुसार, गुणांनुसार आत्माभि-व्यक्तीस वाव मिळाला पाहिजे. निसर्गाच्या चैतन्यमय वातावरणात, शिक्षक व विद्यार्थी यांच्यातील सद्भाव, ज्ञार उणीवा दूर करु शकतो.

योगी अरविंदरावांनी मातृभाषेतील शिक्षण विद्यार्थ्यांची प्रगती घडवून आणणारे आहे. असे विचार व्यक्त केले आहे या सर्वांचा विचार शिक्षकांनी केला पाहिजे.

गुरूचे शिष्याबरोबरचे वर्तन प्रेमळ व आस्थेचे असले पाहिजे. शिष्याबरोबर गोड व मधुरवाणीने बोलले पाहिजे. धर्माभिलाषी गुरु, आचार्य इ. अहिंसेद्वारे कल्याणार्थ उपदेश करायला पाहिजे. उत्तम आचार विचाराच्या शिक्षणाने चारित्र्यबल व बौध्दिक उत्कर्ष होउ शकतो.

आदर्श शिक्षकाची व्याख्या :-

आपल्या विषयावर प्रभुत्व असलेला व शिकविण्याचे तंत्र आत्मसात केलेला शिक्षक, आदर्श शिक्षक होय.

शिक्षण हे एक शास्त्र आहे. म्हणून शिक्षकाने ज्ञानलालसा अभ्यास, विषयज्ञान या दृष्टीने त्यात परिपूर्ण असणे आवश्यक आहे. त्याच बरोबर स्वत: मिळविलेले ज्ञान विद्यार्थ्यांपर्यंत कौशल्याने पोचविणे ही एक कला आहे. दोन्हीही गोष्टी ज्याला जमतील तो शिक्षक आदर्श होय.

नीतीच्या भक्कम पायावरच बुद्धिनिष्ठ साक्षात्कार साध्य आहे. हे पटवून देण्यासाठी उपनिषद् वाङ्मयाचा अभ्यास उपयोगी ठरतो.

जो शिक्षक स्वत: अध्ययन करतो तो खरे शिक्षण देउ शकतो. शिक्षकाने सातत्याने अभ्यास केला पाहिजे. त्याचा अभ्यास थांबला तर

ते योग्य होणार नाही. जसे-जो दिवा स्वत: विझाला आहे. तो दिवा दुसऱ्या दिव्याला प्रज्ज्वलित कसा करेल ?
म्हणून शिक्षकाचे ज्ञानभांडार सदैव संपन्नच असले पाहिजे. त्या ज्ञानास कीड लागता कामा नये. किंवा गंज चढून उपयोगी नाही. सदैव, धार केलेल्या तलवारी-प्रमाणे स्वच्छ, तेजस्वी पाहिजे.

अशा आदर्श शिक्षकाच्या सहवासात, बुद्धि संपन्न, नम्र, सेवाभावी, असा आदर्श शिष्य असला तर त्यांचा "समसमासंयोग घडून" दोघेही ज्ञानरसात एकरूप होतात.

"गुरु माझा, मीही गुरुचा" असा प्रेमभाव।
सद्गुरुच्या छायेखाली पहुडला जीव।।"
सद्गुरुच्या आश्रयाने शिष्य निवांत होतो.

"गुरुकृपे आम्ही आम्ही न उरलो
शून्यात बुडालो स्वानंदाच्या।। "

गुरुची कृपासंपादन केल्यामुळे शिष्याला स्वानंद, परमानंद प्राप्त होतो. असे हे आदर्श गुरु-शिष्य आपल्या तपश्चर्येने विश्वात ज्ञान सूर्याच्या किरणांनी अज्ञान-अंधकार दूर करतातच.
शिवाय त्यांच्या शीतल छायेने संसाराच्या त्रिविध तापाची उष्णता दूर होते. गुरुशिष्यांचा हा प्रभाव फार मोठा होय।

x=x==x=x=x

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

टीप :-

| | | |
|---|---|---|
| १] | दासबोध | [५. ३. २] |
| २] | दासबोध | [५. ३. ७] |
| ३] | श्वेताश्वेतरोपनिषद् | [६. २३] |
| ४] | -"- | [६. २२] |
| ५] | दासबोध | [५. ३. १९] |
| ६] | कौषीतकी उप. | [१. १] |
| ७] | प्रश्नोपनिषद् | [१. २] |
| ८] | कैवल्यनिषद् | |
| ९] | मुंडकोपनिषद् | [१. २. १४] |
| १०] | -"- | [३. २. १०] |
| ११] | दासबोध | [५. ३. २५] |
| १२] | -"- | [५. ३. ४९] |
| १३] | -"- | [५. २ ४७] |
| १४] | कठ उप. | [१. २. ९] |
| १५] | दासबोध | [५. २. ७] |
| १६] | मुंडमाला तंत्र | [ |
| १७] | कौषीतकी उप. | [भाग. १] |
| १८] | बृहदारण्य उप. | [अ. ३ ब्रा. १ ते ८] |
| १९] | मालविकाग्निमित्र | [१. १७] |
| २०] | -"- | [१. १६] |